# प्रेसनोट

दिनांक २९/०६/२०२४

| | | |
|---|---|---|
| १ | युनिटचे नांव | अॅन्टी करप्शन ब्युरो अकोला, घटक |
| २ | आरोपीचे नांव, हुद्दा, वर्ग व कार्यालयाचा पत्ता | १) श्री. हरीदास अभिमान प्रधान, वय–५३वर्षे, पद–पोलीस पाटील ग्राम यावलखेड, रा. यावलखेड ता.जि.अकोला<br>२) श्रीमती मनोरमा पोरे, वय–५५वर्षे, पद–सचिव, ग्राम पंचायत कार्यालय यावलखेड, रा. कौलखेड अकोला ता.जि. अकोला |
| ३ | पडताळणी तारीख | दिनांक २४/०६/२०२४ रोजी |
| ४ | मागणी केलेली रक्कम | १,२०,०००/– रूपये. |
| ५ | स्विकारलेली लाच रक्कम | संशय आल्यावरून लाच स्विकारली नाही. |
| ६ | घटनास्थळ | ग्राम यावलखेड शिवार |

प्रकरणाची थोडक्यात हकीकत अशा प्रकारे आहे की, तक्रारदार यांनी त्यांचे वडिलाचे नावे ग्राम यावलखेड शिवारात हॉटेल, बार आणि रेस्टॉरंट सुरू करण्याकरीता आवश्यक असलेले प्रमाणपत्र आणि इतर कागदपत्रे देण्याकरीता १,२०,०००/– रूपये लाचेची मागणी करीत असल्याची तक्रार दि. २०/०६/२०२४ रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो अकोला येथे तक्रारदार दिली.

नमुद तक्रारीच्या अनुषंगाने शासकिय पंचासमक्ष दि. २४/०६/२०२४ रोजी ग्राम यावलखेड शिवारात जि. अकोला येथे लाच मागणी पडताळणी कार्यवाही आजमाविण्यात आली असता, पंचासमक्ष तक्रारदाराने यातील आरोपी क्र. १ यांना त्यांच्या हॉटेलच्या कामासंबंधाने आवश्यक असलेल्या दाखले आणि प्रमाणपत्रांबाबत विचारणा केली व यापुर्वी सदर कामाकरीता आरोपी क्र. २ श्रीमती पोरे, सचिव, ग्रामपंचायत कार्यालय यावलखेड यांनी मागणी केलेल्या १,२०,०००/–रूपये लाच मागणी केल्याचे तसेच आरोपी क्र. २ श्रीमती पोरे यांनी लाच मागणीस समर्थन देवुन लाच मागणीत सहभाग असल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर आज दि. २७/०६/२०२४ रोजी आरोपी क्र. १ आणि आरोपी क्र. २ यांना त्यांचे मोबाईलवर संपर्क करून भेटण्याबाबत विचारले असता त्यांनी उडवाउडवीची उत्तरे देवुन भेटण्यास टाळाटाळ केली. वरून आरोपी यांनी मागणी केलेली लाच रक्कम तक्रारदार यांच्या कडुन स्विकारणार नसल्याचे व त्यांना संशय आल्याचे तक्रारदार यांची खात्री पटली वरून आरोपी क्र. १ यांना पंचासमक्ष ताब्यात घेण्यात आले व त्यांच्या विरूध्द पो.स्टे. बोरगाव मंजु ता. जि. अकोला येथे अप.नं. ३२३/२४ कलम ७ व १२ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम–१९८८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

सदरची कारवाई पोलीस अधिक्षक श्री. मारूती जगताप, अपर पोलीस अधिक्षक श्री. अनिल पवार लाप्रवि अमरावती यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री.सचिन सावंत, पोलीस निरीक्षक श्री. नरेंद्र खैरनार, पोलीस अंमलदार डिगांबर जाधव, प्रदिप गावंडे संदिप ताले, सुनिल येलोने, किशोर पवार,निलेश शेगोकार, श्रीकृष्ण पळसपगार यांनी केली.

तरी सर्व नागरीकांना आव्हान करण्यात येते कि कोणत्याही शासकीय अधिकारी/कर्मचारी अथवा त्यांच्यावतीने कोणत्याही खाजगी इसमाने त्यांचे कोणतही शासकीय काम करून देण्यासाठी लाचेची मागणी केल्यास तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग अकोला येथील खालील क्रमांवर संपर्क साधावा.

मोबाईल क्र. श्री सचिन सावंत पोलीस निरीक्षक–८८५५८३०८३०
श्री नरेंद्र खैरनार पोलीस निरीक्षक–९१३००१९०७७

ऑफिस फोन नं. ०७२४–२४१५३७०
टोल फ्रि क्रं. १०६४

(सचिन सावंत)
प्र.पोलीस उप अधिक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो, अकोला